- **वसुंधरा चित्रपट महोत्सव उद्घाटन**
  स्थळ : सोलापूर विद्यापीठ वेळ : दुपारी २.३०
- **छायाचित्र प्रदर्शन**
  स्थळ : डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृह
  वेळ : सायंकाळी ६ ते ८

# वसुंधरा महोत्सवात विविधांगी कार्यक्रमांची मेजवानी

- आज दुपारी तीन वाजता विद्यापीठात महोत्सवाचे उद्घाटन होणार
- डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात छायाचित्रांचे प्रदर्शन
- फडकुले सभागृहात डॉ. आनंद कर्वे यांच्या हस्ते वसुंधरा मित्र पुरस्कार प्रदान केले जाणार

प्रतिनिधी । सोलापूर

छायाचित्र प्रदर्शन, दिग्गजांचे व्याख्यान, भेटी, नेचर वॉक, दि हेरिटेज वॉक प्रभात फेरी, पुरस्कार विविध मान्यवरांचा सन्मान अशा विविधांगी कार्यक्रमांची मेजवानी घेऊन किर्लोस्कर वसुंधरा महोत्सवाचे उद्घाटन होणार असल्याची माहिती, महोत्सवाचे संचालक वीरेंद चित्राव यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी त्यांनी आज दुपारी ३ वाजता सोलापूर विद्यापीठात २ ते ५ यावेळेत महोत्सवाचे उद्घाटन होणार आहे. सायंकाळी ६ ते ८ या वेळेत डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात छायाचित्रांचे उद्घाटन व प्रदर्शन होणार आहे. दि २४ रोजी सकाळी ८ ते ११ या वेळेत चार पुतळ्यापासुन रॅली निघणार आहे, तर फडकुले संकुलात चित्रकला स्पर्धा होणार आहे. डॉ. आनंद कर्वे यांच्या हस्ते वसुंधरा मित्र पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत. याच दिवशी वसुंधरा चित्रपट महोत्सवाचे फडकुले सभागृहात उद्घाटनही होणार आहे. दि. २५ जुलै रोजी डॉ. कोटणीस स्मारक येथे सकाळी ७ ते ९ या वेळेत वॉक फॉर हेरिटेज हा उपक्रम असणार आहे. याच दिवशी सकाळी ९ :३० ते ११:३० पर्यंत हसत खेळत पर्यावरण हा कार्यक्रम ज्ञानप्रबोधिनी प्रशालेत व मॉर्डन प्रशालेत प्रश्नमंजूषा कार्यक्रम आयोजित केला आहे. दुपारी २ ते ४ या वेळेत मंगळवेढेकर इन्स्टिट्यूयटमध्ये ग्रीन कॉलेज क्लिन कॉलेज हा उप्रकम व व्याख्यान आयोजित केले आहे. याच दिवशी सायंकाळी ७ वाजता फडकुले सभागृहात फिल्म स्क्रीनिंग हा कार्यक्रम होणार आहे. दि २६ जुलै रोजी सकाळी ७ ते ९ या वेळेत स्मृती वनात नेचर वॉक दुपारी २ ते ४ या वेळेत चार पुतळा परिसर येथे पथनाट्याचे आयोजन व सायंकाळी डॉ. अरुण देशपांडे यांचा सन्मान अनिल अवचट यांच्या हस्ते करण्यात येऊन कार्यक्रमाचा समारोप करण्यात येणार आहे.

## युवकांना समाविष्ट करणार

दरवर्षी चार दिवस वसुंधरा महोत्सवाचे मंथन करून वर्षभर शांत बसण्यापेक्षा युवक-युवतींना सोबत घेऊन काम करण्याचा संकल्प वीरेंद चित्राव यांनी केला असल्याचे मत पत्रकार परिषदेत व्यक्त केले. यावेळी ग्रीन कॉलेज क्लिन कॉलेज या उप्रकमाच्या निमित्ताने हा उपक्रम वर्षभर विद्यार्थीशी जोडून राहतील असेही ते म्हणाले. या पत्रकार परिषदेस डॉ. एस. पी. वैद्य, अमोल चापळकर, प्रा. नरेंद्र काटीकर, बाबूराव पेठकर, ऋषीकेश कुलकर्णी व डॉ. वासुदेव रायते हे उपस्थित होते.